मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# उधळ्या पुत्र



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Lazarus

रूपान्तरकार: Ruth Klassen; Sarah S.

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2014 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.



देवाच्या क्षमेविषयी लोकांना सांगण्यास येशूला आवडत असे. परंतू पापी लोकांशी त्याच्या असलेल्या मैत्रिविषयी यहूदी पुढाऱ्यांनी तक्रार केली. म्हणून जेंव्हा एखाद्या पापीला त्याच्या पापाविषयी पश्चात्ताप होतो तेंव्हा देवाला आनंद होतो हे दाखविण्यासाठी येशूने एकाच वेळी तिन गोष्टी सांगितल्या.



येशूने सर्वात प्रथम ज्या माणसाजवळ शंभर मेंढरे होती अशा एका माणसाची गोष्ट सांगितली.

त्याचे एक मेंढरु हरवले. नव्याण्णव मेढरे तेथेच सोडून तो मेंढपाळ हरवलेल्या एका मेंढराला शोधण्यास गेला.



जोपर्यंत ते मेंढरु सापडत नाही तोपर्यंत त्या मेंढपाळाने त्याचा शोध घेतला. जेंव्हा ते सापडले तेंव्हा त्याने त्याला खाद्यांवर घेतले व तो आनंदाने घरि परतला. आणि त्याने त्याच्या मित्रांना म्हटले, "माझे हरवलेले मेंढरु सापडले आहे म्हणून माझ्याबरोबर आनंद करा."

येशूने स्पष्ट करुन सांगितले
की, जेंव्हा एक पापी
पश्चात्ताप करतो तेंव्हा
स्वर्गात मोठा आनंद साजरा
केला जातो. आपल्या
पापांविषयी एवढे वाईट
वाटणे की ते पाप त्यानंतर
करण्याचे सोडून देणे याला
पश्चाताप असे म्हणतात.





येशूची दुसरी गोष्ट अशा
एका स्त्री विषयी आहे
जीच्याजवळ चांदीची दहा
नाणी होती, कदाचित हि
तिच्या संपूर्ण जीवनाची
कमाई असावी. एक भयंकर
गोष्ट घडली. तिच्या जवळ
असलेल्या नाण्यातील एक
नाणे हरवले.

झाडून ! झाडून ! झाडून ! त्या स्त्रीने सर्व ठिकाणी शोधले.



एखेरिस तिला तिचे हरवलेले नाणे सापडले. तिला फार आनंद झाला. ओळखा पाहू, त्यानंतर तिने काय केले असेल बरे? होय, तिने याविषयी तिच्या सर्व मित्र-मैत्रिणींना सांगितले.





परत येशूने
म्हटले, "त्याप्रमाणे,
पश्चात्ताप करणाऱ्या
एका पापी
माणसांबद्दल
देवाच्या दूतांसमोर
आनंद होतो."

तिसरी जी गोष्ट येशूने सांगितली ती सर्वात दुःखद अशी होती. एक मुलगा त्याच्या बापाचे घर सोडून जातो त्याच्याविषयीची
ही गोष्ट होती.



दुर देशात जाऊन त्या मुलाने त्याच्या जवळील पैसा मुर्खपणाच्या गोष्टीत खर्च करुन टाकला. आता तो काय करणार? परिस्थिती अजून भयंकर बिकट करण्यास, दुष्काळ पडला. त्या मुलाचा जीव जाईल ऐवढी उपासमार होऊ लागली.



खूप भूक लागत असल्यामुळे, त्या मुलाने डुकरे चारण्याचे काम धरले. परंतू कोणीच त्याला खायला देत नसे. डुकरे खात असलेले अन्न त्याने आनंदाने खाल्ले असते. कदाचित त्याने खाल्ले देखिल असावे ! अखेरिस तो मुलगा शुध्दिवर आाला. आणि त्याने विचार केला, "माझ्या घरि नोकरांना देखिल खायला भरपूर आहे."





"मी घरि परत जाईन आणि
म्हणेन की बाबा मला माझ्या
पापांची क्षमा करा. तुमचा
मुलगा म्हणवून घेण्यास आता
मी कोणत्याही प्रकारे लायक
नाही. माझी आशा आहे की ते
मला एक नोकर म्हणून ठेवून
घेतील."

तो मुलगा घरापासून दुर अंतरावर होता तोच, त्याच्या वडीलांनी त्याला येतांना पाहिले. परत येणाऱ्या मुलाकडे बाबा आनंदाने धावत गेले. त्याने त्या मुलाचे मुके घेतले, आणि त्याला आलिंगन दिले.





"बाबा, मी पाप केले आहे.
तुमचा मुलगा म्हणवून घेण्यास
मी लायक नाही." बाबांनी त्या
मुलाला एक नोकर म्हणून ठेवून
घ्यावे असे विचारावे असे त्या
मुलाने मनात विचार केला.
परंतू बाबा मध्येच बोलले,
माझ्या मुलासाठी सर्वोत्कृष्ट
झगा, पायांत जोडा आणि
बोटात अंगठी घालायला आणा.
आणि मोठ्या मेजवानीची
तयारी करा."

त्या ठिकाणी खुप छान मेजवानी देण्यात आली कारण जो मुलगा हरवला होता तो सापडला. या गोष्टीतून जे पापी लोक पश्चात्ताप करुन त्याच्याकडे परत येतात त्यांच्याविषयी देवाला किती आनंद होतो हे कळते म्हणून येशूने हि गोष्ट सांगितली.



उधळ्या पुत्र

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

लूक १५

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला!    योहान 3:16